Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 14 February 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १४ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांचा अमेरिकेचा दौरा आटोपून स्वदेशी निघाले. या दौऱ्यात पंतप्रधानांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासह अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मायकल वॉल्ट्झ यांची भेट घेतली. संरक्षण, तंत्रज्ञान आणि सुरक्षा या मुद्यावर यावेळी सविस्तर चर्चा झाली. कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमी कंडक्टर आणि अवकाश तंत्रज्ञान यासारख्या क्षेत्रात परस्पर सहकार्याची मोठी क्षमता आहे, असं पंतप्रधान म्हणाले. मोदी यांनी भारतीय – अमेरिकन उद्योजक आणि रिपब्लिकन पक्षाचे नेते विवेक रामास्वामी तसंच टेस्लाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एलॉन मस्क यांचीही भेट घेतली.

****

जम्मू काश्मीरमधल्या पुलवामा दहशतवादी हल्ल्याला आज सहा वर्ष पूर्ण झाले. या हल्ल्यात केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या ४० सैनिकांना वीरमरण आलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या हल्ल्यातल्या हुतातम्यांना आदरांजली अर्पण केली आहे. या सैनिकांचं बलिदान येणाऱ्या अनेक पिढ्या कायम स्मरणात ठेवतील, असं त्यांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

प्रयागराज इथं सुरु असलेल्या महाकुंभमेळ्यात कुंभवाणी वाहिनीचं प्रसारण हे प्रसार भारतीच्या अचूक आणि विश्वासार्ह माहिती देण्याच्या उद्देशाचं प्रतिक असल्याचं, प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सेहगल यांनी म्हटलं आहे. ते काल प्रयागराज इथं बोलत होते. त्यांनी संगम सेक्टर चार इथं बांधलेल्या आकाशवाणी आणि दूरदर्शन केंद्रांची पाहणी केली.

****

सामान्य नागरिकांना महागाईचा फटका बसणार नाही, यासाठी विविध उपाय योजणं सरकार सुरू ठेवेल, अशी ग्वाही केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली. राज्यसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना त्या काल बोलत होत्या. आयकरातल्या सवलतींचा फायदा केवळ श्रीमंतांना होईल, हा विरोधकांचा आरोप त्यांनी फेटाळून लावला.

****

सरकार, शेतकरी, संशोधक आणि उद्योग भागधारकांनी सहयोगी दृष्टिकोन स्वीकारल्यास डाळीच्या उत्पादनात भारत आत्मनिर्भर होईल, असं पणन मंत्री जयकुमार रावल यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित भारतीय डाळी परिषदेत ते काल बोलत होते. महाराष्ट्र सरकार डाळींच्या उत्पादनात पुढाकार घेत असून, शाश्वत शेती, संशोधन, सरकारी योजना आणि उद्योग सहभागाद्वारे महाराष्ट्रसह भारत डाळी उत्पादनात आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने आगेकूच करत असल्याचं रावल यांनी नमूद केलं.

****

जगभरातलं तंत्रज्ञान आणि त्यासाठी आवश्यक असणारं मनुष्यबळ आणि संधी भारतात उपलब्ध व्हावी, म्हणून महाराष्ट्र शासनातर्फे मुंबईत १० एकर जागेत, मनोरंजन क्षेत्रातलं जागतिक स्तरावरील शैक्षणिक संस्था उभारणार असल्याची घोषणा, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी केली. पुणे फिल्म फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक विभाग आणि दादासाहेब फाळके चित्रनगरी यांच्या वतीनं आयोजित करण्यात आलेल्या २३ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं उद्घाटन काल आशिष शेलार यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. राज्यातल्या युवकांना मनोरंजन क्षेत्रात मार्गदर्शन मिळावं यासाठी शासन अनिमेशन, व्हिज्युअल, गेमिंग आणि कॉमिक क्षेत्रातल्या शैक्षणिक संस्था उभारणार असून, त्यामध्ये विविध क्षेत्रातल्या जागतिक पातळीवरच्या तज्ज्ञांकडून उच्च शिक्षण दिलं जाणार असल्याचं, शेलार यांनी सांगितलं.

****

विदर्भ विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे मुर्तिजापूरचे माजी आमदार तुकाराम बिडकर यांचं काल अकोल्यात शिवनी इथं अपघाती निधन झालं. एका पिकअप गाडीनं बिडकर यांच्या गाडीला धडक दिल्यानं ते अपघातात गंभीर जखमी झाले होते, रुग्णालयात नेत असताना त्यांचं निधन झालं. अकोल्यात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या नेतृत्वात त्यांनी अनेक आंदोलनात

भाग घेतला होता. गाडगे महाराजांच्या जीवनावर आधारित डेबू चित्रपटाची निर्मितीही बिडकर यांनी केली होती.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी आमदार राजन साळवी यांनी काल शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेनेचे मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचं पक्षात स्वागत केलं.

****

भारतमाला परियोजनेतल्या सुरत – चेन्नई राष्ट्रीय महामार्गाच्या प्रत्यक्ष कामाला सोलापूर जिल्ह्यातल्या अक्कलकोट तालुक्यातून सुरुवात झाली. तालुक्यातल्या जवळपास ११ गावातून हा ३३ किलोमीटरचा महामार्ग जाणार आहे. त्यासाठी जवळपास तीनशे जमीनीचं संपादन करण्यात येणार असून, ८१ टक्के क्षेत्र संपादित करण्यात आलं असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

कुष्ठरोग जनजागृती अभियानांतर्गत जालना शहरात काल रन फॉर लेप्रसी मॅरेथान स्पर्धा घेण्यात आली. सहायक जिल्हाधिकारी पुलकित सिंग यांनी हिरवा झेंडा दाखवून या मॅरेथॉनला सुरुवात केली. जिल्हा सामान्य रुग्णालय ते कुष्ठरोग निर्मुलन कार्यालयापर्यंत काढण्यात आलेल्या मॅरेथानमध्ये क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येनं सहभाग घेतला होता.

****

लातूर महानगरपालिकेने थकित करवसुलीसाठी धडक मोहिम करत काल दिवसभरात एक शिक्षण संस्था कार्यालय, दोन गोदामं, एक  दुकान सील केलं, तर तब्बल १९ नळ जोडणी खंडित केल्या.

****